13 JUL 2023
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर अध्यासनाला सुभाष चौगुले यांच्याकडून देणगी

## विद्यापीठाकडे ५० हजार रूपयांचा धनादेश सुपूर्द

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातील कागलच्या व्हन्नूरमधील सुभाष चौगुले यांनी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी ५० हजार बृहत दान दिले आहे. रूकडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालयात रसायनशास्त्रचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांची बहीण संजीवनी पाटील आणि संध्याराणी पाटील व भाऊ सुनिल चौगुले उपस्थित होते.

चौगुले यांनी देणगी दिल्याबद्दल त्यांचे स्वागत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, डॉ. विजय ककडे उपस्थित होते. दानशूरांनी देणगी द्यावी, असे आवाहन डॉ. ककडे यांनी केले आहे.



**कोल्हापूर : महावीर अध्यासनासाठी ५० हजार रूपयांची देणगी देणाऱ्या सुभाष चौगुले यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत संजीवनी पाटील, संध्यारजणी पाटील, सुनिल चौगुले.**

13 JUL 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅक प्रस्ताव न दिलेल्या कॉलेजना सरकारचा 'परिसस्पर्श'

## परिसस्पर्श योजना कार्यान्वित... शिवाजी विद्यापीठांतर्गत ८२ कॉलेजना मिळणार लाभ

- २८६ पैकी ८२ कॉलेजचा नॅक मानांकनासाठी मुदतीत प्रस्ताव नाही
- प्रस्ताव न दिलेल्या कॉलेजसाठी परिसस्पर्श योजना जाहीर
- शिवाजी विद्यापीठांतर्गत ८२ कॉलेजना मिळणार लाभ
- नॅक प्रस्ताव सादर न केल्यास प्रवेश रद्दची कारवाई
- कारवाईच्या धसक्याने कॉलेजकडून प्रस्तावाची कार्यवाही
- योजनेंतर्गत राज्य सरकारमार्फत आर्थिक साहाय्य

कोल्हापूर : अनुराधा कदम

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयातर्फे अकृषी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन प्रस्ताव, तसेच मानांकन करणे बंधनकारक केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारित येणाऱ्या २८६ पैकी ८२ महाविद्यालयांनी नॅक मानांकनासाठी प्रस्ताव मुदतीत सादर केला नाही. शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सेल विभागाच्या वतीने राज्याच्या उच्च शिक्षण मंत्रालयाकडे संबंधित कॉलेजची यादी पाठवण्यात आली होती.

या यादीत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील काही नामांकित महाविद्यालयांचा



समावेश आहे. आता मुदतीनंतर तरी या महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकनासाठी प्रस्ताव सादर करावा, यासाठी राज्य सरकारने परिसस्पर्श योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेंतर्गत प्रस्ताव देण्यासाठी मार्गदर्शन समिती स्थापन करण्याबरोबरच राज्य सरकारच्या वतीने कॉलेजला अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे.

### काय आहे परिसस्पर्श योजना

परिसस्पर्श योजनेंतर्गत राज्य सरकारच्या वतीने राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय समित्यांची स्थापना केली आहे. विद्यापीठ स्तरावरील समितीच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अखत्यारितील कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांतील नॅक प्रस्ताव मुदतीत न दिलेल्या कॉलेजचा पाठपुरावा करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने काही निकष सांगितले आहेत. नॅक मूल्यांकनासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या प्रक्रियेला येणाऱ्या खर्चासाठी आर्थिक बजेट नसलेल्या कॉलेजना राज्य सरकारतर्फे अर्थसाहाय्य केले जाणार आहे. नॅक मूल्यांकनासाठी प्रस्ताव कसा सादर करायचा, त्याची मांडणी कशाप्रकारे करायची, त्यामध्ये कॉलेजमधील सुविधांबाबत सादरीकरण कसे करायचे, याबाबत परिसस्पर्श योजनेतून मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये मेंटर सुविधाही आहे. ज्या कॉलेजना ए.ए. प्लस मानांकन मिळाले आहे, अशा कॉलेजच्या प्रतिनिधींना मेंटर बनवून त्यांच्याकडे अन्य कॉलेजला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपवण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठांतर्गत गुणवत्ता सेल या विभागाच्या वतीने कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांतील गुणवत्ता वाढीसाठी काम केले जाते. शिवाजी विद्यापीठांतर्गत २८६ पैकी ८२ कॉलेजने मुदतीत प्रस्ताव न दिल्याने त्यांचे प्रवेश रद्द होण्याचा धोका होता; मात्र आता नॅक प्रस्ताव सादर न केलेल्या कॉलेजला सरकारच्या परिसस्पर्श योजनेचा फायदा होईल. शिवाजी विद्यापीठात याबाबत पाठपुरावा करण्यासाठी येत्या आठवड्यात बैठक होणार आहे.

-डॉ. एन. एस. देशमुख, संचालक, अंतर्गत गुणवत्ता सेल, शिवाजी विद्यापीठ

लोकमत

# महावीर अध्यासनास चौगुले यांची देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी वन्नूर (ता. कागल) येथील प्रा. सुभाष आण्णासाहेब चौगुले यांनी ५० हजार रुपयांची देणगी दिली. प्रा. चौगले हे रुकडीतील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालयात रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम पाहत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते चौगुले यांचा सत्कार झाला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, आदी उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे ४४७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध प्रकारच्या ९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा बुधवार, दि. १२ पासून सुरू झाल्या आहेत. परीक्षांसाठी एकूण ४०८९ विद्यार्थी उपस्थित होते.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा-या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.